udyan-

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/४८५
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.१५/०६/२०१७

-: जाहिरात :-

**WALK - IN- INTERVIEW**

दि.२७/०६/२०१७, वेळ दुपारी ११.०० वाजता

स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत पशु वैद्यकीय विभागाकरिता पशु वैद्यकीय अधिकारी या पदी तात्पुरत्या स्वरुपात **अकरा महिन्याच्या** कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | पशु वैद्यकीय अधिकारी | १ (एक) | **बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच.अथवा एम.व्ही.एस.सी (मेडीसीन) व किमान तीन वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य** | एकवट मानधन रुपये ३०,०००/- प्रति माह यावर अकरा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

शर्ती व अटी :-

१) वयोमर्यादा :- दि.०१/०६/२०१७ रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये.उच्च व नादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.

४) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन करून घेण्यात येईल.

५) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

६) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

७) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

८) कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहातील.
९) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.
१०) सदरची नियुक्ती ही केवळ ठरावविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार पत्र करुन दयावे लागेल.
११) इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज सादर करावा.
१२) सदरचे जाहिरात सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

**पशुवैदयकिय अधिकारी या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.**

१) सदरची नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर राहील. सदरचे करार पत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून दयावे लागेल.

२) सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधीकरिता असून पूर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील. नियुक्तीस अकरा महिन्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही.

३) याकामी करारपध्दतीने दरमहा रुपये ३०,०००/- इतके एकवट मानधन दिले जाईल.

४) आपली नियुक्ती ही सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील प्राणीसंग्रहालय, येथील पशु,पक्षी, व प्राणी यांचे आरोग्य व इतर देखरेख व औषधोपचार तसेचं कत्तलखाने येथील लहान व मोठया जनावराची शासकिय नियमाप्रमाणे तपासणी करणे तसेच पशु वैदयकिय कार्यालयाकडील त्या अनुषंगाने सर्व कामे करणे.

५) सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६) नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. आपली नियुक्ती ही करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर राहील.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

८) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असाल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा नियुक्तीपुर्वी हजर करणे बंधनकारक राहील.

९) सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही,अशा स्थितीत प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१०) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट मानधन रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहील.

(सही)

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.